E-5293239

जा.क्र.मुदवसुअ/प्रा/परिपत्रक/ /२०२५
मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/ प्राधिकरण, मुंबई
दि. 07/05/2025.

**दक्षता विभागाचे परिपत्रक -२०**

विषय- सेवा पुरवठादारांकडून निविदा मागविताना निश्चित करावयाच्या गुणांकनाबाबत.

म्हाडामध्ये आवश्यक असलेल्या सेवांबाबत सेवा पुरवठादारांकडून निविदा मागविताना, त्या तांत्रिक निविदा व आर्थिक निविदा अशा दोन भागांमध्ये मागविल्या जातात. प्रथम तांत्रिक निविदेचे मुल्यांकन केले जाते. जे निविदाकार तांत्रिक निविदेमध्ये पात्र होतात अशा तांत्रिक निविदाकारांच्या आर्थिक निविदा उघडल्या जातात. तांत्रिक निविदेच्या मुल्यांकनासाठी विविध निकष ठरविलेले असतात.काही निविदांमध्ये निविदाकारांकडून सादरीकरणाचे गुणसुध्दा असतात. जीईएम (Government E-market Place) या पोर्टलवरील मार्गदर्शक तत्वानुसार तांत्रिक निविदा तपासताना निविदाकाराद्वारे दिलेले सादरीकरणाला १५ पेक्षा जास्त भारांकन (Weightage) नसावे.

या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, म्हाडा अंतर्गत काही मंडळे वर नमूद मार्गदर्शन तत्वांचे पालन करीत नाहीत. यास्तव या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, म्हाडाच्या सर्व निविदा प्रक्रियेमध्ये पारदर्शकता व नि:पक्षता आणण्यासाठी निविदेची तांत्रिक मुल्यांकन करताना निविदाकाराने दिलेले सादरीकरणासाठी १०० पैकी १५ पेक्षा जास्त गुण देण्यात येऊ नयेत.

सदर आदेशाचे काटेकोरपणे पालन करावे.

(विनीत अग्रवाल)
अपर पोलीस महासंचालक तथा
मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.

प्रति,
मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ मंडळ.
मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ.
मुख्य अधिकारी, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, अमरावती गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी, प्राधिकरण.

प्रत: उपाध्यक्ष/ प्राधिकरण यांना माहितीसाठी.